(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

NAVJYOT / Vol. XII / Issue – IV ISSN 2277-8063

# ' एक देश , एक निवडणूक ' याची वर्तमान काळातील उपयुक्तता

**डॉ. अनिल रा. कडू** (राज्यशास्त्र विभाग प्रमुख) स्व. पंचफुलाबाई पावडे कला व वाणिज्य महिला महाविद्यालय वरूड, जिल्हा - अमरावती, 444 906

---

**प्रास्ताविक :**

याचा सरळ अर्थ देशात लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळेस घेणे असा आहे. नागरिकांना या दोन्ही निवडणुकांसाठी एकाच वेळी मतदान करता येईल. सध्या देशात विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका वेगवेगळ्या वेळी दर पाच वर्षांनी घेतल्या जातात. केंद्र सरकारने सप्टेंबर महिन्यात संसदेचे विशेष अधिवेशन बोलावले आहे. त्यामुळे ' एक देश, एक निवडणूक ' बाबत नरेंद्र मोदी सरकार गांभीर्याने विचार करीत आहे हे स्पष्ट होते. त्याच अनुषंगाने या शोध निबंधात ' एक देश, एक निवडणूक ' याची वर्तमान काळातील प्रासंगिक तपासून पाहणे गरजेचे आहे.

शोध निबंधाची उद्दिष्टे : 'एक देश, एक निवडणूक' याची वर्तमान काळातील उपयुक्तता तपासून पाहणे.

**संशोधन पद्धती :**

प्रस्तुत शोध निबंध अध्ययनासाठी दुय्यम स्त्रोतांचा वापर करून त्याचे संकलन करण्यात आले आहे. अध्ययन विषयाची संबंधित दुय्यम तथ्य संकलित करण्यासाठी प्रकाशित, अप्रकाशित असलेले शोध अध्ययन, संदर्भ ग्रंथे , मासिके, साप्ताहिके, वृत्तपत्रे, संशोधन पत्रिका इत्यादी दुय्यम स्त्रोतांच्या माध्यमातून संकलित करण्यात आलेली आहे.

आशय विश्लेषण:

देश स्वतंत्र झाला तेव्हा सार्वत्रिक प्रौढ मताधिकाराच्या आधारावर राज्यांमध्ये आणि केंद्रात नवीन कायदेमंडळं निवडणं आवश्यक होतं. त्यानुसार 1951-52मध्ये पहिली सार्वत्रिक निवडणूक झाली आणि तिच्या बरोबरच सर्व राज्यांमध्ये त्यांच्या कायदेमंडळाच्या निवडणुका झाल्या. आपल्या संविधानाप्रमाणे कायदेमंडळाची मुदत पाच वर्षांची असते. पण राज्यात मुख्यमंत्री आणि केंद्रात पंतप्रधान मुदतीपूर्वी कायदेमंडळ बरखास्त करण्याची शिफारस करू शकतात. मुदतीपूर्वी अविश्वासाचा ठराव मंजूर झाला आणि दुसरे सरकार बनू शकले नाही तरी कायदेमंडळ मुदतीपूर्वी बरखास्त होते आणि नव्या निवडणुका होतात.भारतात स्वतंत्र पासून 1967 पर्यंत लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकाच वेळी घेतल्या जात होत्या. पण, त्यानंतर काही राज्यांच्या विधानसभा 1968 आणि 1969 मध्ये विसर्जित करण्यात आल्या. त्यानंतर 1970 मध्ये लोकसभा विसर्जित करण्यात आली होती. त्यामुळे लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका वेगवेगळ्या तारखांना होऊ लागल्या.

एका विशिष्ट कालावधीत लोकसभेबरोबरच विधानसभा निवडणुका घेण्याची ही संकल्पना आहे. वेगवेगळ्या काळात निवडणुका घेतल्यास मोठ्या प्रमाणात खर्च होतो, तो वाचेल. निवडणुकीसाठी वारंवार आचारसंहिता लागू केल्याने विकास कामांमध्ये अडथळे येतात, हे टाळता येईल अशी संकल्पनेच्या समर्थकांचे म्हणणे आहे. कोणतेही सरकार निवडणुकांमध्ये व्यग्र राहते. त्याचा परिणाम प्रशासन तसेच कामकाजावर होतो. कर्मचारी निवडणूक कामांमध्ये गुंतून राहतात. एकाच वेळी निवडणुका झाल्यास सुशासनावर लक्ष केंद्रित करता येईल. याखेरीज मतदारांचा सहभागही यामुळे वाढेल. कारण एकाच वेळी विविध मतदान यंत्रांवर ते मतदान करू शकतील. 1950 ते 1960 च्या दरम्यान चार वेळा याची अंमलबजावणी करण्यात आली होती. 1967 पर्यंत हे निरंतर सुरू होते. मात्र त्याच दरम्यान अनेक राज्यांमध्ये राष्ट्रपती शासन लागू करण्यात आले होते. तसेच 1970 मध्ये लोकसभेची मुदतपूर्व निवडणूक झाली. दुसरा मुद्दा म्हणजे त्यावेळी मतदार कमी होते तसेच राज्य ही थोडी होती. त्यामुळे एकाच वेळी निवडणुका शक्य झाली. विधी आयोगाने 2018 मध्ये अशा निवडणुकांची शिफारस केली आहे. त्यामध्ये एकत्रित निवडणूक घेण्याबाबत विविध पर्याय सुचविण्यात आले आहेत. त्यावेळी त्याची विविध राजकीय पक्षांशी चर्चा केली होती. त्यावेळी पाठिंबा दिलेले पक्ष आता काय भूमिका घेतात हा मुद्दा आहे.

'एक देश, एक निवडणूक' झाली आणि एखादे सरकार आपला पूर्ण कालावधी पूर्ण करू शकले नाही, त्या आधीच ते सरकार कोसळले तर हे चक्र विस्कळीत होण्याचा धोका आहे. यावर एक उपाय म्हणजे मध्यावधी निवडणुका झाल्यास पोट निवडणुकीप्रमाणेच निवडून आलेल्या सरकारचा कार्यकाळ उर्वरित कालावधीसाठीच ग्राह्य धरला जाईल. त्यामुळे निवडणूक प्रक्रिया बदलताना अशा प्रकारचा कायदा तयार करणे आवश्यक आहे. दुसरा प्रश्न म्हणजे भारतात लोकशाही आहे, मात्र येथील काही ठिकाणी बड्या पाश्चिमात्य देशांप्रमाणे थेट लोकशाही नाही. उदाहरणार्थ आपण मत देतो पण आपण

निवडून दिलेला उमेदवार किंवा सरकार यांना आपल्याप्रति पुढील पाच वर्षे कोणतेही उत्तरदायित्व असणे बंधनकारक नाही. पाश्चिमात्य देशांमध्ये महत्त्वाच्या निर्णयांमध्ये जन्मताच कौल घेण्याची परंपरा आहे. ब्रिटनमध्ये ब्रेक्झिट विषयी जनमत घेतले गेले. हा निर्णय केवळ खासदार व सरकार वर सोडण्यात आलेला नाही. पण आपल्याकडे मोदी सरकारने 2015 मध्ये जमीन अधिग्रहण कायदा आणण्याचा प्रयत्न केला. त्याला खूप विरोध झाला पण जनतेला काय हवे आहे हे विचारण्यात आले नाही. "एक देश-एक निवडणुकीमुळे देश विकासाच्या मार्गावर वेगाने अग्रेसर होईल," असे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी नेहमीच सांगितले आणि देशहिताचा, 'राष्ट्रहित सर्वोपरी'चा हाच विचार घेऊन मोदींनी यासाठी सर्वपक्षीय बैठकीचे आयोजनही केले. तसे बघायला गेले तर ही सर्वपक्षीय बैठक होती आणि केंद्र सरकारने यावर चर्चा करण्यासाठी देशातील ४० पक्षांना निमंत्रणही पाठवले. पण, त्यात सर्वच पक्षांनी भाग घेतला नाही. भाजपनंतरचा सर्वात मोठा राष्ट्रीय पक्ष असलेल्या, देशावर सर्वाधिक काळ सत्ता गाजविणाऱ्या काँग्रेसने, आक्रस्ताळ्या ममतांच्या तृणमूल काँग्रेसने, चंद्राबाबूंच्या तेलुगू देसमने, मायावतींच्या बसपने आणि स्टॅलिनच्या द्रमुकने या सर्वपक्षीय बैठकीवर बहिष्कार टाकला. अन्य महत्त्वाच्या मुद्द्यांवरून लक्ष हटविण्याचा सरकारचा हा प्रयत्न असल्याचे यापैकी काहींनी म्हटले तर मायावतींनी पुन्हा एकदा इव्हीएमचा राग आळवला. "एक देश-एक निवडणुकीऐवजी इव्हीएमच्या मुद्द्यावर बैठक बोलावली असती तर मी आले असते," असे त्या म्हणाल्या. मोदींनी गेली पाच वर्षे मांडलेल्या या देशहिताच्या मुद्द्यावर असल्या आडमुठ्या विरोधकांमुळेच काही ठोस कार्यवाही करता आली नाही, हेच या पक्षनेत्यांच्या वरील विधानांवरून स्पष्ट होते. पण, जे पक्ष या बैठकीला उपस्थित होते, त्यांच्या सहमतीने केंद्र सरकारने 'एक देश-एक निवडणुकी'साठी उच्चस्तरीय समिती स्थापन करणार असल्याचे जाहीर केले. आता लवकरात लवकर या समितीची स्थापना होऊन 'एक देश-एक निवडणूक' पद्धतीच्या अंमलबजावणीच्या दिशेने मंथन होऊन तोडगा काढला जाईल, अशी खात्री वाटते.

समर्थकांच्या म्हणण्यानुसार- एकाच वेळी सर्वच निवडणुका झाल्यास वेळेची, पैशाची आणि मनुष्यबळाची मोठी बचत होईल. अशा निवडणुकांमुळे केंद्र आणि राज्य सरकारांना, तसेच पक्ष कार्यकर्त्यांना विकासकामासाठी अधिक वेळ देता येईल. कारण, सध्याच्या स्थितीत सततच्या निवडणुकांमुळे विकासकामांवर आचारसंहितेची बंधने येतात, प्रचारासाठी कार्यकर्त्यांचा अधिक वेळ खर्च होतो, जो वाचवणे आवश्यक आहे. दुसरीकडे सततच्या निवडणुकांमुळे सरकारी तिजोरीवर अतिरिक्त ताण येतो, जो एकाचवेळी निवडणुका झाल्यास येणार नाही आणि खर्च होणारा पैसा विकासकामांकडेच वळवता येईल. केंद्र असो वा राज्य पातळीवरील निवडणुकांत भ्रष्टाचाराने, बेकायदेशीर मार्गाने मिळवलेल्या काळ्या पैशाचा वापर होतो आणि या वापरासाठी काळा पैसा कमावण्याकडेही जरा अधिकच लक्ष दिले जाते, पण एकाचवेळी निवडणुका झाल्यास त्यावर अंकुश लावता येईल. शिवाय, वाचलेला सरकारी पैसा जनतेच्या भल्यासाठी उपयोगात आणणे शक्य होईल. दुसरीकडे सततच्या निवडणुकांमुळे राजकीय पक्ष आणि नेत्यांकडून सामाजिक एकता आणि शांतताभंगाची संधीही शोधली जाते. काहीतरी खुसपटे काढून कायदा-सुव्यवस्था बिघडवणे, हिंसाचार पसरवणे आणि यातून लक्ष वेधून घेण्याचे उद्योगही केले जातात. हे प्रकार सतत चालूच असतात. सोबतच अशा काळात पोलिसांना, सुरक्षा बलांनाही तैनात करावे लागते. पण जर एकाचवेळी निवडणुका झाल्या तर तसे काही होणार नाही, सर्वत्र शांतता नांदू शकेल आणि सुरक्षा बले आपली निहित कर्तव्ये पार पाडू शकतात. वरील मुद्द्यांवरून तरी एक देश-एक निवडणुकीमुळे होणारे फायदे अधिक आणि तोटे नसल्यासारखेच वाटते. पण, ज्यांना चांगल्या कामांची आणि देशहिताचीच ॲलर्जी आहे, ते त्याचा विरोध करणारच ना? विरोधी पक्ष हे असे आहेत, म्हणून आता जनतेनेच केंद्र सरकारला एक देश-एक निवडणुकीवर सकारात्मक पाठिंबा द्यायला हवा.

एक देश एक निवडणुकीचे फायदे :

'एक देश, एक निवडणूक' झाल्यास सगळ्यात मोठा फायदा निवडणुकांवरील खर्च कमी होईल. निवडणूक एकाच वेळी घेतल्याने वेगवेगळ्या निवडणुकांवर करावा लागणारा खर्च कमी होईल. माहितीनुसार एक 2019 च्या लोकसभा निवडणुकीत तब्बल 60,000 कोटी रुपये खर्च करण्यात आले होते. यात पक्षांनी केलेला खर्च, निवडणूक आयोगाने निवडणुकांची नियोजन करण्यासाठी केलेल्या खर्चाचा समावेश आहे. मध्य आशियातील किरगिझस्तान आणि ताझिकिस्तान या दोन मध्यम-उत्पन्न देशांचा एकूण 'जीडीपी' या रकमेइतकाच आहे. यावरून ही रक्कम किती अधिक आहे, हे समजते. ६० सहस्र कोटी अमेरिकन डॉलरमध्ये रूपांतरित केले, तर ते अनुमाने ८ अब्ज (ट्रिलियन) (६० सहस्र कोटी) अमेरिकी डॉलर्सहून अधिक होतात. आम्ही ५ वर्षांत दोनदा एवढी मोठी रक्कम व्यय करतो; कारण आम्ही विधानसभा आणि लोकसभा निवडणुका एकाच वेळी घेऊ शकत नाही. प्रशासकीय, शासकीय कर्मचारी आणि सुरक्षा दल यांचा वापर या निवडणूक प्रक्रियेमध्ये मोठ्या प्रमाणात केला जातो. लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुकीवेळी सुरक्षा दल

शासकीय कर्मचाऱ्यांना विविध ठिकाणी निवडणुकीच्या कामासाठी लावलं जातं. निवडणुका एकत्र ठेवल्यास कर्मचाऱ्यांचा व्याप कमी होईल आणि ते आपल्या कामावर अधिक लक्ष देऊ शकतील. देश 'पॉलिसी पॅरालिसिस'पासून वाचू शकेल; कारण जेव्हा पुन्हा-पुन्हा निवडणुका घेतल्या जातात, तेव्हा निवडणूक संहितेच्या कार्यवाहीमुळे धोरणात्मक निर्णय घेता येत नाहीत. त्यामुळे विकासकामात अडथळे निर्माण होतात.

केंद्र सरकार आणि राज्य सरकारच्या योजनांमध्ये सातत्य ठेवण्यासाठी एकत्र निवडणुकीचा फायदा होईल. राजकीय पक्ष लोक उपयोगी योजनांमध्ये जास्त लक्ष देऊ शकतील. राजकीय नेत्यांचा बराचसा वेळ निवडणूक प्रचारात जात असतो. तसेच निवडणुकीच्या दरम्यान नवीन प्रकल्प किंवा योजना जाहीर करण्यास बंदी असते, त्यामुळे विकास कामांवर निर्बंध येतात. लॉ कमिशनच्या रिपोर्टनुसार, 'एक देश, एक निवडणूक' मुळे मतदानाचा टक्का वाढेल. कारण, लोकांना एकाच वेळी मतदान करणे सोयीचे जाईल. निवडणूक आयोगाला प्रतिवर्षी मतदार सूचीचे नूतनीकरण करावे लागते. अनेक वेळा घाईगडबडीत नूतनीकरण योग्य प्रकारे होत नसल्याने कामातही वाढ होते. यातूनही सर्वांची सुटका होईल.

एक देश एक निवडणुकीचे तोटे :

विधानसभा आणि लोकसभेच्या निवडणुका एकाच वेळी घ्यायचे झाल्यास संविधानामध्ये दुरुस्ती करावी लागेल. विधानसभेच्या निवडणुका लोकसभा निवडणुकीची संलग्न करावे लागतील. तसेच 'रिप्रेझेंटेशन ऑफ पीपल्स ऍक्ट' मध्ये दुरुस्ती करणे आवश्यक होईल. स्थानिक पक्षांचा या प्रस्तावाला विरोध असण्याचा सर्वात महत्त्वाचा मुद्दा हा आहे की, निवडणुकीदरम्यान ते स्थानिक प्रश्न प्रभावीपणे मांडू शकणार नाहीत. 2015 मध्ये आयडीएफसी इन्स्टिट्यूटने केलेल्या अभ्यासानुसार 77% शक्यता अशी असेल की लोक राज्यातील आणि केंद्रातील एकाच पक्षाला निवडून देतील. निवडणूक सहा महिन्यांच्या अंतराने ठेवली तर 61 टक्के लोकच सारख्या पक्षाला मतदान करतील. एकत्र निवडणुकींमुळे भारताच्या संघराज्य राज्याला धोका पोहोचू शकतो असा दावा काहीजण करतात.

निष्कर्ष :

केंद्र सरकारने मांडलेली एकत्रित निवडणुकांची कल्पना प्रत्यक्षात येण्यासाठी संसदेत त्याबाबतचा प्रस्ताव मंजूर व्हावा लागेल. त्यासोबत, किमान १५ राज्यांच्या विधानसभांनाही या प्रस्तावावर मंजुरीची मोहोर उमटवणे गरजेचे असेल. त्याआधी केंद्र सरकारला ही घटनादुरुस्ती आधी लोकसभेत आणि नंतर राज्यसभेत मंजूर करून घ्यावी लागेल. सरकारने विशेष अधिवेशन सेंट्रल हॉलमध्ये आयोजित केल्यास ही मंजुरी सोपी होईल.

संदर्भ :

1.पुजारी कार्तिक - 'one nation- one election' - esakal.com - 1 September 2023.

2.रानडे डॉ. अजित - ' एक देश, एक निवडणूक ' राबविणे खरेच शक्य आहे ?' - loksatta.com- 10 September 2023.

3.लोंढे श्रीकांत - ' one nation- one election' - hindusthantimes.com - 31 August 2023.

4. कपुर सिध्दार्थ - ' एक देश, एक nivadnuk' एक व्यापक सहमती हवी' - orfonline.org - 9 July 2023.